# ॥ अध्याय चौदावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ गुरु सांगती शिष्यासी । स्वामिराज वसती तीर्थक्षेत्रासी । वास्तविक परोपकार करावयासी । संचरती क्षुत्पिपासा टाकुनी ॥ १ ॥ दासोपंत दत्तोपासक । मुकुंदराज महात्मा नामक । सत्पुरुष साधुसंत अनेक । वसती पर्वतीं आनंदें ॥ २ ॥ 'जोगाईचें आंबें' नामक । मोंगलाईंत क्षेत्र एक। डोंगर सुंदर खडक । शोभिवंत दिसतसे ॥ ३ ॥ जोगाई देवी जगदंबा । आदिमाया विश्वकदंबा । परमेश्वरी निरालंबा । आंबेग्रामीं विलसतसे ॥ ४ ॥ अंबेचें वसतिस्थान । ग्राम 'आंबें' नाम म्हणून। सहस्रावधि लोक येऊन । दर्शनासी घेती ते ॥५॥ ऐशा सुस्थान डोंगरांत । स्वामिमहाराज विचरत । गोरक्षकांचे मुलांत । बाललीला खेळती ॥ ६ ॥ त्या गोरक्षकांची एक मुलगी । सौंदर्यशील निरोगी । पंच वर्षांची अनुरागी । गोष्टी सांगे यतीसवें ॥ ७ ॥ यतिरायास नित्य नेमें । भाकर देतसे ती सप्रेमें । टाकूनियां इतर कामें । चरणीं लीन होतसे ॥ ८ ॥ पूर्वसंस्कार प्रबळ । त्यायोगें बुद्धि विशाळ । दिवसेंदिवस भाव निर्मळ । यतिपदकमलीं झालासे ॥ ९ ॥ नित्य चाले ऐसा क्रम । वदे हाचि पराक्रम । जन्मा येऊन त्रिविक्रम । अंतर्यामीं जाणिजे ॥ १० ॥ एके दिवशीं तिची माता । विचार करी सहभर्ता । आपली कन्या रूपसौंदर्यता- । युक्त असे मनोहर ॥ ११ ॥ आपले गृहासमोर । श्रीमंत असे सावकार । उद्यान गृह माड्या मंदिर । भृत्यासमवेत नांदतसे ॥ १२ ॥ त्यासी नसे पुत्रसंतान । तदर्थ करावें एक साधन ।'कन्येसी वस्त्रालंकार घालून । मुलगा म्हणोन देइजे ॥ १३ ॥ गुप्त न सांगावें कवणासी । सौख्य होईल आपणांसी । हा विचार पूर्ण मानसीं । गुराख्यांनीं केला हो

॥ १४ ॥ करविला पुरुषवेष धारण । वस्त्रालंकारभूषणें लेववून । करविलें अश्वारोहण । सेवकजनसमवेत ॥ १५ ॥ पुढें होतसे वाद्यगजर । गुलाल वर्षे पुत्रावर । नेऊन ग्रामाबाहेर । देवमंदिरीं बैसविलें ॥ १६ ॥ श्रीफल पुष्पें अर्पिती । देवासी नमन करविती । बैसवूनि अश्वावरती । दृष्ट काढिती पुत्राची ॥ १७ ॥ वाजत गाजत उत्साहीं । सावकाराचे आले गृहीं । पुत्रावरूनि उतारा लवलाहीं । ओंवाळूनि टाकिती ॥ १८ ॥ सावकारासी दंडवत । गुराखी घालिती विनययुक्त । आपणांप्रीत्यर्थ आजपर्यंत । पुत्रशोधांत होतों जी ॥ १९ ॥ अकस्मात् सुदैवेंकरून । हें सर्वोत्कृष्ट पुत्ररत्न । ईश्वरप्रेरणार्थ सम्प्रयत्न । प्राप्तकालीं लाभलें ॥ २० ॥ हा पुत्र परम सुंदर । केला आपुल्या चरणीं सादर । आपणांसी प्रसन्न परमेश्वर । निश्चयात्मक जाहला ॥ २१ ॥ ऐकूनियां शुभवचनास । सावकार कळवी पत्नीस । आप्त सखे सोयऱ्यांस । परमानंद वाटला ॥ २२ ॥ मेघ वर्षतां चातकास । सूर्योदयें पक्षुपक्ष्यादिकांस । वाटे अपरिमित उल्हास । तैसा आनंद वर्तला ॥ २३ ॥ बालास निजांकावरी बैसवून । सावकारें दिधलें आलिंगन । मिष्टपदार्थ मुखीं घालून । करी चुंबन मुहुर्मुहुः ॥ २४ ॥ कुलदेवगुरुवृद्धांसी । विद्वान्विप्रसंतांसी । कुलाचारपरंपरेसी । केलें वंदन बालानें ॥ २५ ॥ मग सावकारें धरूनि करीं । स्थापिलें पुत्रास गादीवरी । गीत वाद्य नानाकुसरी । नृत्यादिक मनोहर ॥ २६ ॥ नंतर उत्तम भोजन झालें । तांबूल दक्षिणादान दिधलें । उभयतांस कृतकृत्य वाटलें । पुत्ररत्न पाहूनि ॥ २७ ॥ शुक्लपक्षींच्या चंद्रकला । जैशा पावती वृद्धीला । दिनें दिनें पत्रपुष्पसकलां । तरु वाढती जैसे कीं ॥ २८ ॥ विपुल वर्षतां पर्जन्य । वर्धती अष्टादश धान्य । दिवसेंदिवस पुत्र सामान्य । वर्धमान जाहला ॥ २९ ॥ कांहीं दिवसांनंतर । पत्नीसह सावकार । तनयाचा विवाहविचार । करूं अवश्य म्हणती ते ॥ ३० ॥ प्रधानसहित आश्रितमंडळ । पाचारिले आप्त सकळ । पंडित ज्योतिषी गणितफळ । ज्ञाते द्विज आणिले ॥ ३१ ॥ सावकार म्हणे हो

आपण । चिरंजीवाचें पाणिग्रहण । करावया जन्मटिपण । पहा मुहूर्त चांगला ॥ ३२ ॥ ऐकूनि सांगती पंडित । आजी उत्तम योग असे निश्चित । पाठवावे प्रधान सुमंत । वधुशोधाकारणें ॥ ३३ ॥ मग सावकारें मंडळ । प्रेषिलें वधुशोधना तात्काळ । गंगाखेडाकडे तें उतावीळ । गेलें वस्त्रालंकारासहित ॥ ३४ ॥ सर्वप्रकारें अनुकूळ । पाहिलें योग्य सुस्थळ । कन्या चतुर विवेककुशल । दृढांगी चपल विराजे ॥ ३५ ॥ उत्तम मार्गशीर्षमासीं । शुक्लपक्षीय दशमीसी । गुरुवार तिथिनिश्चयासी । करूनि आलें मंडळ ॥ ३६ ॥ सावकारासी वृत्तशुभ । निवेदिलें वस्तुलाभ । उत्तम असें साहित्य प्रारंभ । अविलंब करा हो ॥ ३७ ॥ वस्त्रें अलंकार उत्तम । अमूल्य रत्नजडित हेम । गजाश्वरथादि उत्तम । शिबिका अंबाऱ्यादि वाहनें ॥ ३८ ॥ विविधपूर्ण अन्न सामग्री । सिद्ध करूनि सत्वरीं । निघाले जावया कन्यानगरीं । एकसहस्त्र वऱ्हाडी ॥ ३९ ॥ वाजती भेरी मृदंग । पाहूनि होती लोक दंग । रागरागिणी जलतरंग । वाजविती गाती आनंदें ॥ ४० ॥ भव्यमंदिरीं रमणीय शाखा । व्याह्यासी दिधला जानिवसा । आदरें मान योग्यसा । जलान्न-पदार्थपूरित ॥ ४१ ॥ देवप्रतिष्ठा भोजन । झालें सीमांतवरपूजन । वाङ्निश्चय यथाविधान । होतां जन आनंदले ॥ ४२ ॥ वधूकडील चतुरस्त्रिया । हळदी लाविती वराचे पायां । सूक्ष्मदृष्टीनें पाहती तया । म्हणती वाया सगळें हें ॥ ४३ ॥ नसती पुरुषाचे अवयव । स्त्रीचेंचि दिसे लक्षण वैभव । कुजबुजती यौवननव । स्पष्ट अवयव स्त्रियेचे ॥ ४४ ॥ एकाएकी गलबला । हाःहाःकार स्त्रियांत माजला । सावकारासी वृत्तान्त कळला । फुटलें प्रारब्ध म्हणे तो ॥ ४५ ॥ फारचि अपमानकारक । अत्यंत खेदजनक । उभयपक्षासी जाहला शोक । म्हणती धिक्कार आम्हांसी ॥ ४६ ॥ अपकीर्ति पसरली उदंड । हे काय कपटें कुभांड । आतां लोकांत काळें तोंड । दावावें कीं मरावें ॥ ४७ ॥ सावकार आणि पत्नी । दुःखें हंबरडा फोडुनी । घेत कपाळ बडवुनी । होती फारचि विव्हळ ॥ ४८ ॥ हें मूळचें काय कपट । शोधिलें नसे

आम्ही नीट। विपरित प्रारब्धखटपट। वृथा वांचणें कायसें ॥ ४९ ॥ आतां नको गृहद्वार। यमलोकचि श्रेयस्कर। मनोभंग कठिणतर। साहवेना आम्हांसी ॥ ५० ॥ धन-कीर्तिस मिळविलें। आजपर्यंत व्यवहारिलें। तें सकल धुळीस माखिलें। गेलें बुडालें पाण्यांत ॥ ५१ ॥ पूर्वदुष्कृत आड आलें। प्रारब्ध आमचें फुटलें। हरहर ईश्वरें काय केलें। बहुत घडविलें विपरित ॥ ५२ ॥ कोणासीही न पुसतां। बोलतां न विचारितां। वऱ्हाड निघालें दुःसह चिंता–। युक्त आलें स्वनगरीं ॥ ५३ ॥ गेले आपापले सदनीं। चिंतानदींत निमग्न होऊनि। सावकारें भूपतीचे कानीं। घातलें वृत्त सर्वही ॥ ५४ ॥ राजाज्ञें त्या मुलासी। संगें देऊनि मारेकऱ्यांसी। धाडिलें विजन-अरण्यासी। शिरच्छेद करावया ॥ ५५ ॥ कपटी गोरक्षकाचें घर। लुटून करावें देशपार। भूपतिविद्यमान कारभार। आज्ञानुसार होतसे ॥ ५६ ॥ त्या डोंगरांत मारेकरी। वधावया नेती सुंदरी। तंव ते म्हणे ऐका घटिकाभरी। नका मारूं मजलागीं ॥ ५७ ॥ या डोंगरांत संन्यासीबुवा। मज आजोबासमान बरवा। तयाचे चरण वंदूनि निरोप घ्यावा। ऐसा हेतु मानसीं ॥ ५८ ॥ मारेकऱ्यांस उपजली दया। चला म्हणती पाहूं तया। मग बालकास वधूं या। होईना कां विलंब ॥ ५९ ॥ आम्रवृक्षातळीं सिद्धासन। स्वामिसमर्थ विराजमान्। तेथें उदकझरा लहान। मंद मंद वाहतसे ॥ ६० ॥ पुष्पलताफलसंबंध। चोहोंकडे सुटला सुगंध। पक्ष्यांसह तरूचें स्कंध। शोभती आनंददायक ॥ ६१ ॥ पक्ष्यांचे मंजुलध्वनि। मनोहर पडतां कानीं। संतोष पूर्ण दाटे मनीं। ऐसी वनशोभा अपूर्व ॥ ६२ ॥ वारंवार वायुलहरी। स्पर्शतां किंचित् शरीरीं। शीतल आल्हाद हितकारी। वाटे येथेंचि वसावें ॥ ६३ ॥ असो तें गोरक्षबाल। मृत्युभयें उतरलें मुखकमल। आधींच तनु सुंदर कोमल। चिंताविव्हल अंतरीं ॥ ६४ ॥ जगत्पितामह-स्वामिपायीं। लोटांगणें ठेविली डोई। म्हणे मायबाप तुम्ही अक्षयीं। म्हणोनि आलों शरणागत ॥ ६५ ॥ मग साद्यंत सविस्तर। वृत्त निवेदिलें भयंकर।

शरणागतासी अव्हेर । गुरुमाउली न व्हावा ॥ ६६ ॥ सर्वस्वीं मी चरणदास । चरणीं संदृढ विश्वास । तारक संरक्षक विश्वास । सकलाधार आपणचि ॥ ६७ ॥ भक्तवत्सल स्वामी वरद । सांभाळावें निजब्रीद । क्षणांत माझा शिरच्छेद । आजोबा होत पहा हो ॥ ६८ ॥ स्वामी म्हणती होय सावध । ब्रह्मादिकांचा करूं निरोध । अशक्य होय तुझा वध । भीति मानसीं न धरावी ॥ ६९ ॥ योगिराज मुनींद्र यति । मारेकऱ्यांस सांगती । सावकार ग्रामाधिपति । येथें शीघ्र आणावे ॥ ७० ॥ नातरी तुम्ही प्राणोंसी । मुकाल शीघ्रगतीसीं । पाहूनि नृसिंहमूर्तीसी । दचकले मारेकरी ॥ ७१ ॥ सर्वेचि गेले नगरांत । सांगती सकल वृत्तांत । ईश्वर कोपलिया त्वरित । होय प्रलय सगळ्यांचा ॥ ७२ ॥ सर्वत्रमंडळीसह सावकार । धांवत आला सत्वर । नृसिंहमूर्ति उग्रावतार । देखूनि थरथर कांपतसे ॥ ७३ ॥ स्वामी म्हणती सकळिकां । मुलगा मुलगी पहा निका । परीक्षा करा अवलोका । या बालका दुष्ट हो ॥ ७४ ॥ मग सगळे अवलोकिती । पुरुषावयव प्रजापति । भयभीत होऊनि म्हणती । विलक्षण आश्चर्य हें ॥ ७५ ॥ पुरुषावयव पुल्लिंग । दृढपुरुषत्व यथासांग । विलोकूनि झाले दंग । म्हणती श्रीरंग पावला ॥ ७६ ॥ स्वामीसमर्थगुरुचरणीं । लोळती अवघे लोटांगणीं । धन्यधन्य अगाधकरणी । ब्रह्मादिकां अगम्य ॥ ७७ ॥ जन्माची कन्या सावयवी । ब्रह्मदेवें निर्मिली बरवी । कपटें पुरुष म्हणतां लाजवी । मरणतुल्य विवाहीं ॥ ७८ ॥ जन्म स्त्रीचा पुरुष करणें । हें देवादिकां न होणें । अथवा पुरुषाची स्त्री बनविणें । हेंही सोपें नव्हेचि ॥ ७९ ॥ जें न करवे देवां सुरां । तें अघटित कृत्य दातारा । स्वामिराया दयासागरा । केलें तुवां अपूर्व ॥ ८० ॥ सावकार विनवी कर जोडून । आम्ही अल्पमति अज्ञान । नेणों स्वामिचरित्र गहन । मदांधेंकरून योगिया ॥ ८१ ॥ या चतुर्दश ब्रह्मांडांत । जें जें आहे ईश्वरनिर्मित । तें नष्ट करूनि दुजें घडित । समर्थकर्तृत्व पूर्ण हें ॥ ८२ ॥ प्रारब्धावरी मारिती मेख । पुसोनि टाकिती विधिलेख । महापुरुषकर्तृत्व सुरेख । अतुलसामर्थ्य आपुलें ॥ ८३ ॥

आपली करितां स्तुति । स्तब्ध झाल्या वेदश्रुति । आम्ही संसारिक मंदमति । नेणों गति अगम्य ॥ ८४ ॥ धन्य धन्य भाग्य सुदिन । झालें समर्थचरणदर्शन । क्षमा असावी म्हणोन । साष्टांगीं नमनें पूजिती ॥ ८५ ॥ समर्थ आज्ञापिती सकळां । पहा आमुच्या प्रियबाळा । पुरुषत्वाची पूर्ण कळा । अबला प्रबला साधिजे ॥ ८६ ॥ पुन्हा विलोकिती नारीनर । समर्थप्रासादिक पुरुषाकार । निःशंक चकित सावकार । झाले विस्मित अवघेही ॥ ८७ ॥ ब्रह्मांडामाजीं मावेना । आनंद दाटला ऐसा जनां । ब्राह्मणभोजन समाराधना । केलें पूजन अत्यादरें ॥ ८८ ॥ श्रीगुरुस्वामी पूर्णवरद । आशीर्वचन पुत्रप्रसाद । घेऊनि निघाले महदानंद– । युक्त निरोप सद्गुरुचा ॥ ८९ ॥ सावकारें घरीं येऊन । व्याह्यासी केलें पत्रलेखन । मार्गशीर्षवद्य दशमीदिन । विवाहनिश्चय झालासे ॥ ९० ॥ येतांचि पत्रोत्तर । सिद्ध सामग्री अलंकार । घेऊनि निघाला सावकार । एक सहस्र वऱ्हाडी ॥ ९१ ॥ जानवसा पहिले स्थानीं । व्याह्यानें दिधला आदरें-करूनि । भोजनसमारंभ होऊनि । सीमांतपूजन जाहलें ॥ ९२ ॥ लोक करिती उपहास । जाणोनि पूर्वीचा इतिहास । कोणी म्हणती भोजनास । दानदक्षिणा मिळेल ॥ ९३ ॥ स्त्रिया गदगदा हांसती । पुनःपुन्हां टाळ्या पिटिती । शहाणपणाची फजिती । पडेल आतां दृष्टीस ॥ ९४ ॥ वाङ्निश्चय हरिद्राप्रसंग । पूर्ववत् घडला साङ्ग । त्याच स्त्रिया वराचें पुरुषांग । पाहूनि दंग जाहल्या ॥ ९५ ॥ हें काय वर्तलें नवल । स्त्रीअवयव नष्टले समूळ । वरश्रेष्ठ पुरुषत्व प्रबळ । पुरुषावयव स्पष्ट हे ॥ ९६ ॥ प्रसन्न असेल चक्रपाणी । अगाध अमानुष करणी । कैसें घडलें गे साजणी । पूजिले भवानीशंकर ॥ ९७ ॥ अथवा इंद्रजाल गारूड । मणिमंत्र साधन भारूड । किंवा साधूनें दिलें चिथुड । करिती बडबड चावटी ॥ ९८ ॥ ‘शुभं भवतु सावधान’। मंगलाष्टकें विप्रवचन । भेरी मृदंग नृत्य गान । मारिती तान गायक ॥ ९९ ॥ आशीर्वाद [illegible] । वर्षितां वधुवरांवरी तत्त्वतां । आनंद न माय

चित्ता । सुप्रसन्नता सर्वांसी ॥ १०० ॥ असो विवाह समारंभ । सर्वोत्कृष्ट निर्विघ्न अदंभ । द्विजांसी दिधलें सुवर्णकुंभ । भरिले सदाक्षिणांभ-सहित ॥ १ ॥ कुटिल स्त्रियांसी जामातें । जेव्हां दाविलें पुरुषार्थातें । टाकोनि उन्मत्ताभिमानातें । लागती पायांतें अनन्य ॥ २ ॥ विवाहसमारंभचमत्कार । जामात पुरुषार्थाचें भाण्डार । देखूनि करिती नमस्कार । जोडिती कर क्षमार्थें ॥ ३ ॥ लक्ष्मीतेज आनंदवृद्धि । यश बल विजय समृद्धि । दीर्घायु आरोग्य चित्तशुद्धि । हरि-भक्ति लाधली ॥ ४ ॥ यासी सुपुत्रसंतान । ज्ञानविज्ञानसंपन्न । सत्पुरुष कीर्तिमान् । आयुष्मान् होईल ॥ ५ ॥ आशीर्वचन समर्पण । प्रसन्न-वदनें श्रेष्ठ ब्राह्मण । म्हणती 'उदयोऽस्तु' कल्याण । पुत्रपौत्रें नांदाल ॥ ६ ॥ तदनंतर हर्षभरित । सावकार पुत्रस्नुषासहित । व्याही समस्तांसी बोळवित । यथायोग्य सन्मानें ॥ ७ ॥ वस्त्रालंकार जामाता । तैसेंचि अर्पिलें समस्तां । व्याही वदे प्रेमें आतां । कृपा लोभ असावा ॥ ८ ॥ वऱ्हाड आलें स्वनगरीं । आनंद वर्तला धनिकद्वारीं । तात्काळ गेले सकळ डोंगरीं । स्वामिरायांच्या दर्शना ॥ ९ ॥ नानापदार्थ-फलांसी । अर्पिती स्वामीसमर्थांसी । स्वामी वदती बाळासी । कुटुंबसह क्षेम असो ॥ ११० ॥ दोन पुत्र झाल्यावरी । भेटीस यावें प्रज्ञापुरीं । गुप्त गोष्ट ही प्रगट न करी । शास्त्राचारें वर्तावें ॥ ११ ॥ नरहरि ऐसें बोलिले । तात्काळ अंतर्धान पावले । सर्वांसी आश्चर्य वाटलें । पुरुषोत्तम म्हणती हे ॥ १२ ॥ समस्त आनंदोत्साही । आले आपापले गेहीं । स्वामिलीलामृत सर्वदाही । कल्याणार्थ प्राशिती ॥ १३ ॥ परमपुरुष परमहंस– । प्रसादें सावकारपुत्रास । कांहीं गेलिया वर्ष मास । पुत्र प्राप्त जाहले ॥ १४ ॥ द्वादशवर्षांचीं बालकें । खेळती लीला कौतुकें । बालहट्ट घेती जितुके । तितुके पुरविती उल्हासें ॥ १५ ॥ षोडश वर्षांचे पुत्र झाले । विवाह शुभकार्या करविलें । मोठे बुद्धिमान निघाले । विद्वान् साजले ते पुत्र ॥ १६ ॥ समर्थांचा आशीर्वाद सत्य । सुखी नांदती उभय दंपत्य । सावकारपुत्रें पाहूनि कृत्य । सावध झाला

परमार्थी ॥ १७ ॥ श्रीगुरुकृपें मूळची विरक्ति । त्यांत वाढली स्वामीभक्ति । तुटली संसार आसक्ति । जीवन्मुक्ति व्हावया ॥ १८ ॥ सर्वत्रांचे आज्ञानुसार । सोडूनि प्रपंच संसार । स्वामिद्वारास संतोषें सत्वर । निघाला यतिवरदर्शना ॥ १९ ॥ कांहीं न कलह प्रपंच विकार । वैराग्य सद्भक्त उदार । त्यागूनि देहअहंकार । सावकारपुत्र निघाला ॥ १२० ॥ लोकांसि फार संसार सोस । सोडितां होय जीव कासावीस । कदाचित् त्यागिल्या न सुटे आस । सत्य वैराग्य तें नव्हे ॥ २१ ॥ वैराग्य घेती ऋणासाठीं । दुराचारिणी स्त्री मोठी । स्त्रीमुळें तीर्थाचे कांठीं । कंटाळुनी जाती विरक्त ॥ २२ ॥ प्रिय स्त्रीपुत्रांचा वियोग । मनासारिखे न मिळती भोग । दंड कारागृह येतां योग । वैराग्य वेष साधिती ॥ २३ ॥ परस्त्री-परधनापहार । विश्वासघातें गृहद्वार । संपादूनि गोष्टी चतुर । वैराग्यविचार बोलती ॥ २४ ॥ ऐसें नव्हे वैराग्य कृत्रिम । विषयेच्छारहितकाम । तीव्रवैराग्य कृत्रिम । स्वामिभक्त परमविरागी ॥ २५ ॥ मनोजय वासनाक्षय । अंतःकरण शुद्ध निरामय । तें यथार्थ निर्मलवैराग्य । इहामूत्रभोग टाकणें ॥ २६ ॥ असो सर्वांचा घेऊनि निरोप । श्रीगुरुचरणांसमीप । कुलोद्धारक कुलदीप । प्रज्ञापुरीं पातला ॥ २७ ॥ नमन करी वारंवार । स्तोत्र वर्णीत अपार । कायावाचामनें तत्पर । शुद्धांतर गुरुपुत्र ॥ २८ ॥ समर्थ वदती तयासी ऐका । कां रे बाळा गोरक्षका । आलासि सख्या परमार्थिका । आज्ञा-पालका सत्यत्वें ॥ २९ ॥ गोसावी होऊन षण्मास । अनुभवुनी परब्रह्मास । समर्थाज्ञें तीर्थयात्रेस । गेला गिरनार पर्वतीं ॥ १३० ॥ म्हणे ब्रह्मनिष्ठ वामन । गिरनार पर्वतीं मजलागून । सावकारपुत्र सुजाण । कमंडलू तीर्थीं भेटला ॥ ३१ ॥ स्वामिलीला गुप्तकथा । साद्यंत निवेदिली सर्वथा । अक्षरशः तीच गुंफिली यथार्था । नव्हे अन्यथा श्रोते हो ॥ ३२ ॥ श्रीगुरु दत्तात्रेयस्वामी ब्रह्मानंद । अद्भुतानंत गुणानुवाद । वर्णितां न सरती विशद । शास्त्रें वेद थकताति ॥ ३३ ॥ श्रीगुरु शिष्यासी सांगती । अपार लीला न मावे त्रिजगतीं । जगदुद्धारार्थ यथामति । करा श्रवण प्रीतीनें ॥ ३४ ॥ लीलामृत-

श्रवणें निर्वेध । पिशाच्चभूतादि संबंध । नष्ट होती अनेक बंध । दुरितनिरोध ग्रंथपठणें ॥ ३५ ॥ जैसा करतलामलक । अनुभव स्पष्ट सम्यक् । तैशीं प्राप्त सौख्यें अनेक । एकनिष्ठें अवलोका ॥ ३६ ॥ पुढिले अध्यायीं कथन । रसभरित आख्यान । वदविता समर्थ अत्रिनंदन । दयाघन समर्थ ॥ ३७ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । वेदशास्त्रपुराणसंमत । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित । चतुर्दशाध्याय गोड हा ॥ १३८ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे चतुर्दशोऽध्यायः समाप्तः ॥ १४ ॥ श्रीगुरुदेवदत्त – स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥ ॥ ॥

